THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

FRIDAY, 25TH SEPTEMBER 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**भिक्षेकरी रक्तपित्यांना इतर लोकांपासून निराळे ठेवण्याबाबद आणि कित्येक धंदे करणाऱ्या रक्तपित्यांवर निर्बंध ठेवण्याबाबद ठराव करण्यासाठीं आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थीं भिक्षेकरी रक्तपित्यांना इतर लोकांपासून निराळे करण्याबाबद, आणि कित्येक धंदे करणाऱ्या रक्तपित्यांवर निर्बंध ठेवण्याबाबद ठराव करणें योग्य आहे; त्या अर्थीं यावरून खालीं सांगितल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) या आक्टास सन १८९६ चा रक्तपित्यांबाबद आक्ट असें ह्मणावें. सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; परंतु

(३) त्याच्या कोणत्याहि भागास तो लागू केला आहे असें, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वीं मंजुरी घेऊन स्थानिक सरकार, स्थानिक ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून जाहीर करी तोंपर्यंत त्या भागांत तो अमलांत येणार नाहीं.

२. या आक्टांत, विषयास अगर संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(१) "रक्तपित्या" ह्मणजे ज्या कोणत्याहि मनुष्यास कोणत्याहि प्रकारचा कुष्ठरोग झाला असून ज्याच्या अंगास क्षतें पडण्यास सुरुवात झाली असेल तो मनुष्य; आणि

(२) "भिक्षेकरी रक्तपित्या" ह्मणजे असा रक्तपित्या कीं —

(अ) ज्यानें, सार्वजनिक जागेंत, भिक्षा मागितली असेल, किंवा दया आणण्याच्या अगर भिक्षा मिळविण्याच्या उद्देशानें कोणतींहि क्षतें, जखमा, शारीरिक व्याधि अथवा कुरूपता उघडी टाकली असेल अगर दाखविली असेल, किंवा

(ब) जो उपजीविकेच्या कोणत्याहि दिसत्या साधनावांचून मोकळा भटकत असेल.

३. स्थानिक सरकार, स्थानिक ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, कोणतीहि जागा, या आक्टाच्या कारणांसाठीं रक्तपित्यांचें आश्रयस्थान ह्मणून नेमण्यास, व अशा आश्रयस्थानास ज्या स्थानिक प्रदेशांतून रक्तपित्यांना पाठवावयाचे तो स्थानिक स्थानिक सरकारानें रक्तपित्यांचीं आश्रयस्थानें नेमण्याबाबद.

प्रदेश ठरविण्यास मुखत्यार आहे, आणि, त्याच रीतीनें, अशा कोणत्याहि जाहिरनाम्यांत फेरबदल करण्यास किंवा तो रद्द करण्यास मुखत्यार आहे.

**रक्तपित्यांचे इन्स्पेक्टर व आश्रयस्थानांचे सुपरिंटेंडेंट यांस नेमण्याबाबद.**

४. स्थानिक सरकार, आपणास जरूर वाटेल तेव्हां एस्टाब्लिशमेंटानिशीं, कोणत्याहि सरकारी वैद्यकीय अमलदारास रक्तपित्यांचा इन्स्पेक्टर ह्मणून व कोणत्याहि मनुष्यास रक्तपित्यांच्या आश्रयस्थानाचा सुपरिंटेंडेंट ह्मणून, नांवानें किंवा त्याच्या हुद्याच्या नात्यानें, नेमण्यास मुखत्यार आहे, आणि याप्रमाणें नेमलेला प्रत्येक अमलदार किंवा मनुष्य, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या २१ व्या कलमाच्या अर्थाप्रमाणें, सरकारी नोकर आहे असें समजलें पाहिजे.

**बोर्डाची रचना.**

५. ३ ऱ्या कलमाअन्वयें नेमलेल्या रक्तपित्यांच्या प्रत्येक आश्रयस्थानासाठीं स्थानिक सरकारानें कमींत कमी तीन मेंबरांचा एक बोर्ड स्थापन केला पाहिजे व त्यांपैकीं निदान एक मेंबर सरकारी वैद्यकीय अमलदार असला पाहिजे.

**भिक्षेकरी रक्तपित्यांना धरण्याबाबद.**

६. ३ ऱ्या कलमाअन्वयें जाहिर केलेल्या कोणत्याहि स्थानिक प्रदेशाच्या आंत कोणताहि पोलीस अमलदार, जो कोणताहि मनुष्य भिक्षेकरी रक्तपित्या आहे असें त्यास दिसून येईल त्या मनुष्यास, वारंटावाचून धरण्यास मुखत्यार आहे.

**धरलेल्या मनुष्याची कशी व्यवस्था करावी.**

७. सदरील शेवटच्या कलमाअन्वयें धरलेल्या प्रत्येक मनुष्यास तावडतोब रक्तपित्यांच्या इन्स्पेक्टरापुढें घेऊन गेलें पाहिजे, व त्या इन्स्पेक्टरानें—

(अ) असा मनुष्य २ ऱ्या कलमाच्या अर्थाप्रमाणें रक्तपित्या नाहीं असें त्यास आढळून आल्यास, त्या मनुष्याला परिशिष्टांत नमूद केलेल्या अ नमुन्याप्रमाणें एक दाखला दिला पाहिजे आणि मग अशा मनुष्याला लगेच अटकेंतून सोडून दिला पाहिजे;

(ब) असा मनुष्य २ ऱ्या कलमाच्या अर्थाप्रमाणें रक्तपित्या आहे असें त्यास आढळून आल्यास, ज्या पोलीस अमलदाराच्या रखवालींत तो रक्तपित्या असेल त्या पोलीस अमलदाराला परिशिष्टांत नमूद केलेल्या ब नमुन्याप्रमाणें एक दाखला दिला पाहिजे; आणि मग त्या रक्तपित्यास, विनाकारण विलंब न लावतां, या आक्टाअन्वयें हुकुमत असणाऱ्या माजिस्ट्रेटापुढें घेऊन गेलें पाहिजे.

**भिक्षेकरी रक्तपित्यांच्या संबंधानें काम चालविण्याची रीति.**

८. जेव्हां स्थानिक सरकारानें या बाबतींत अधिकार दिलेल्या कोणत्याहि माजिस्ट्रेटास, परिशिष्टांत नमूद केलेल्या ब नमुन्याप्रमाणें रक्तपित्यांच्या इन्स्पेक्टरानें दिलेल्या लेखी दाखल्यावरून, कोणताहि मनुष्य रक्तपित्या आहे असें, दिसून येईल तेव्हां, व आणखी तो मनुष्य भिक्षेकरी रक्तपित्या आहे असें त्या माजिस्ट्रेटास दिसून आल्यास, त्यानें, जो पुरावा घेणें त्यास योग्य वाटेल असा आणखी पुरावा ( कांहीं असल्यास ) तो, व त्यावर आपला हुकुम, लिहून ठेविल्यानंतर, त्या भिक्षेकरी रक्तपित्यास एकाद्या पोलीस अमलदाराच्या ताब्यांत देऊन, परिशिष्टांत नमूद केलेल्या क नमुन्याप्रमाणेंच्या हुकुमासहित, रक्तपित्यांच्या आश्रयस्थानास पाठविलें पाहिजे, व अशा रक्तपित्यास, त्या आश्रयस्थानासाठीं ५ व्या कलमाअन्वयें स्थापन केलेल्या बोर्डाच्या हुकमानें सोडून देण्यांत येई तोंपर्यंत, तेथें अटकावून ठेवला पाहिजे.

**कित्येक धंदे करणाऱ्या रक्तपित्यांबाबद.**

९. जो कोणी मनुष्य रक्तपित्या असून, ३ ऱ्या कलमाअन्वयें जाहीर केलेल्या कोणत्याहि स्थानिक प्रदेशाच्या आंत, खालीं सांगितलेल्या धंद्यांपैकीं कोणताहि धंदा चालवील किंवा खालीं सांगितलेल्या कृत्यांपैकीं कोणतेंहि कृत्य करील, ह्मणजे,—

(अ) वैद्याचा धंदा करील, किंवा हजामाचें, धोब्याचें, भिस्त्याचें, रोटीवाल्याचें, हलवायाचें, शिंप्याचें, कापडविक्याचें, हाबरडॅशर( सुईदोरा वगैरे विकणारा )चें, किंवा घरचाकराचें, काम करील;

(ब) मनुष्यांच्या खपासाठीं ह्मणून योजलेलें कोणतेंहि अन्न, पेय किंवा औषधी द्रव्य विकील;

(क) सार्वजनिक विहीर किंवा स्नानाची जागा यांपाशीं स्नान करील, अगर कोणताहि सार्वजनिक प्यावयाच्या पाण्याचा फाउंटन, विहीर, हैड्रंट, तलाव किंवा टाकें यांतून पाणी घेईल; किंवा

(ड) कोणत्याहि सार्वजनिक वाहनांत बसून जाईल;

त्यास परकाष्ठा पन्नास रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल;

मात्र इतकेंच कीं जेव्हां कोणत्याहि मनुष्यावर या कलमाअन्वयें एखाद्या अपराधाचा आरोप आणला असेल, तेव्हां ज्या माजिस्ट्रेटापुढें त्याजवर आरोप आणला असेल त्या माजिस्ट्रेटानें त्यास रक्तपित्यांच्या इन्स्पेक्टराकडून तपासविला पाहिजे, व अशा इन्स्पेक्टरानें अशा मनुष्याच्या संबंधानें, परिशिष्टांत नमूद केलेल्या ब नमुन्याप्रमाणें, दाखला दिल्याशिवाय, त्या माजिस्ट्रेटानें त्या खटल्यासंबंधीं काम चालवूं नये.

१०. सदरील शेवटल्या कलमाअन्वयें शिक्षा होण्याजोगा अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव ज्या कोणत्याहि रक्तपित्यावर झाला असेल त्याजवर त्या कलमाअन्वयें शिक्षा होण्याजोगा कोणताहि अपराध केल्याच्या शाबितीचा पुनः ठराव होईल तेव्हां तेव्हां माजिस्ट्रेट, असा रक्तपित्या ज्या कोणत्याहि शिक्षेस पात्र असेल त्या शिक्षेखेरीज आणखी किंवा त्या शिक्षेऐवजीं,— पूर्वीं अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यानंतर पुनः अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यास.

(अ) ३ ऱ्या कलमाअन्वयें जाहिर केलेल्या ज्या स्थानिक प्रदेशांत तो असेल त्या प्रदेशांतून ताबडतोब निघून जाण्याबद्दल, व रक्तपित्यांचा इन्स्पेक्टर परिशिष्टांत नमूद केलेल्या अ नमुन्याप्रमाणें त्यास दाखला देईपर्यंत त्या किंवा सदर्हूप्रमाणें जाहिर केलेल्या इतर कोणत्याहि स्थानिक प्रदेशांत न शिरण्याबद्दल ज्यावरून तो बांधला जाईल असें एका किंवा अधिक जामिनांनिशीं खत लिहून देण्याविषयीं त्याला फर्माविण्यास मुखत्यार आहे; किंवा

(ब) त्याला एखाद्या पोलीस अमलदाराच्या ताब्यांत देऊन, परिशिष्टांत नमूद केलेल्या ड नमुन्याप्रमाणेंच्या हुकुमासहित, रक्तपित्यांच्या आश्रयस्थानास पाठविण्यास मुखत्यार आहे; व अशा रक्तपित्यास, त्या आश्रयस्थानासाठीं ९ व्या कलमाअन्वयें नेमलेल्या बोर्डाच्या हुकुमानें सोडून देण्यांत येई तोंपर्यंत, तेथें अटकावून ठेवला पाहिजे.

११. जो कोणी, परिशिष्टांत नमूद केलेल्या क नमुन्याप्रमाणें किंवा ड नमुन्याप्रमाणें माजिस्ट्रेटानें दिलेल्या हुकुमाअन्वयें रक्तपित्यांच्या आश्रयस्थानास पाठविण्यांत आला असून, त्या आश्रयस्थानाच्या सुपरिंटेंडेंटाच्या लेखी परवानगीवांचून, त्यांतून पळेल किंवा तें सोडून जाईल, त्याला कोणताहि पोलीस अमलदार वारंटावांचून धरण्यास मुखत्यार आहे, आणि त्याला, धरल्यावर, ताबडतोब रक्तपित्यांच्या सदर्हू आश्रयस्थानास परत घेऊन गेलें पाहिजे. पळालेल्या रक्तपित्यांना पुनः धरण्याबाबद.

१२. रक्तपित्यांच्या कोणत्याहि आश्रयस्थानासाठीं ९ व्या कलमाअन्वयें स्थापन केलेल्या बोर्डाचा वैद्यकीय अमलदार व इतर एक किंवा अधिक मेंबर यांनीं, असा बोर्ड रक्तपित्यांच्या ज्या आश्रयस्थानासाठीं स्थापन केला असेल तें आश्रयस्थान, प्रत्येक तिमाहींत निदान एकदा तरी तपासून पाहिलें पाहिजे, आणि त्यांत या आक्टाच्या ठरावांअन्वयें अटकावून ठेवलेला प्रत्येक रक्तपित्या, व सदर्हू बोर्ड शेवटीं ज्या वेळीं बोर्डानें तपासून पाहण्याबाबद.

पाहावयास आला त्या वेळेपासून सदर्हूप्रमाणें अटकावून ठेविलेल्या प्रत्येक रक्तपित्यास घेण्याबद्दलचा हुकुम, हे, बनूं शकेल तेथवर, पाहिले पाहिजेत व तपासून पाहिले पाहिजेत, व त्या आश्रयस्थानाची व सदर्हूप्रमाणें अटकावून ठेविलेल्या रक्तपित्यांची व्यवस्था व स्थिति यांच्या संबंधानें त्यांना योग्य वाटेल तो अभिप्राय नोंदण्याच्या कारणासाठीं ठेवलेल्या एका बुकांत त्यांनीं तो नोंदला पाहिजे.

बोर्डानें सोडून देण्याचा हुकुम करण्याबाबद.

१३. रक्तपित्यांच्या कोणत्याहि आश्रयस्थानासाठीं ९ व्या कलमाअन्वयें स्थापन केलेल्या बोर्डाचा वैद्यकीय अमलदार व निदान दोन इतर मेंबर यांना कोणत्याहि वेळीं, परिशिष्टांत नमूद केलेल्या इ नमुन्याप्रमाणें आपल्या सहीचा लेखी हुकुम करून, या आक्टाच्या ठरावांअन्वयें रक्तपित्यांच्या सदरहू आश्रयस्थानांत अटकावून ठेवलेल्या कोणत्याहि रक्तपित्यास त्यांतून सोडून देण्याविषयीं फर्माविण्याचा अख्त्यार आहे.

अपिलें.

१४. भिक्षेकरी रक्तपित्या खेरीज करून इतर ज्या कोणत्याहि मनुष्याच्या संबंधानें रक्तपित्यांच्या इन्स्पेक्टरानें, परिशिष्टांत नमूद केलेल्या ब नमुन्याप्रमाणें दाखला देऊन तो मनुष्य रक्तपित्या आहे असें ठरविलें असेल, किंवा परिशिष्टांत नमूद केलेल्या अ नमुन्याप्रमाणें दाखला देण्यास नाकारलें असेल तो मनुष्य, या बाबतींत स्थानिक सरकारानें नेमलेल्या अमलदारास अपील करण्यास मुखत्यार आहे, आणि अशा अमलदारानें केलेला ठराव अखेरचा असेल असें समजावें.

कानू करण्याचा स्थानिक सरकारचा अधिकार.

१५. स्थानिक सरकारास, स्थानिक ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, खालीं सांगितलेल्या गोष्टींसाठीं कानू करण्याचा अख्त्यार आहे, ह्मणजे,—

(अ) या आक्टाअन्वयें कोणतेंहि काम करणाऱ्या अमलदारांपैकीं सर्व किंवा कोणत्याहि अमलदाराच्या समजुतीसाठीं;

(ब) रक्तपित्यांच्या आश्रयस्थानाच्या व्यवस्थेसाठीं व त्यांत शिस्त राहण्यासाठीं; आणि

(क) साधारणतः, या आक्टाचे हेतु सिद्धीस नेण्यासाठीं;

आणि, त्याच रीतीनें, सदर्हूप्रमाणें केलेल्या कोणत्याहि कानूंत फेरफार करण्याचा किंवा ते रद्द करण्याचा अख्त्यार आहे.

---

## परिशिष्ट.

### अ.—दाखला.

(कलम ७.)

मी, खालीं सही करणार (येथें नांव व हुद्याचें नांव लिहावें), यावरून दाखला लिहून देतों कीं मी (येथें तपासून पाहिलेल्या मनुष्याचें नांव लिहावें) यास तारीख माहे सन रोजीं येथें जातीनें तपासून पाहिला, व सदर्हू हा, सन १८९६ च्या रक्तपित्यांबाबदच्या आक्टांत व्याख्या केल्याप्रमाणें, रक्तपित्या नाहीं.

माझ्या सहीनिशीं दिला असे, आज तारीख माहे सन १८९ .

(सही.)

रक्तपित्यांचा इन्स्पेक्टर.

---

### ब.—दाखला.

( कलमें ७, ८, ९ व १४. )

मी, खालीं सही करणार ( येथें नांव व हुद्याचें नांव लिहावें ), यावरून दाखला लिहून देतों कीं मी ( येथें रक्तपित्याचें नांव लिहावें ) यास तारीख माहे सन रोजीं येथें जातीनें तपासून पाहिलें, आणि सदर्हू हा, सन १८९६ च्या रक्तपित्यांबाबदच्या आक्टांत व्याख्या केल्याप्रमाणें, रक्तपित्या आहे, आणि मी हा अभिप्राय खालीं दिलेल्या कारणांवरून दिला आहे, ह्मणजे,—

( येथें कारणें लिहावीं. )

माझ्या सहीनिशीं दिला असे, आज तारीख माहे सन १८९ .

(सही.)
रक्तपित्यांचा इन्स्पेक्टर.

---

### क.—अटकावून ठेवण्याचें वारंट.

( कलम ८. )

———————— येथील रक्तपित्यांच्या आश्रयस्थानाचे सुपरिंटेंडेंट यांस.

ज्या अर्थीं ( नांव व वर्णन ) हा, सन १८९६ च्या रक्तपित्यांबाबदच्या आक्टांत व्याख्या केल्याप्रमाणें भिक्षेकरी रक्तपित्या असल्याचें माझ्या नजरेस आणलें आहे:

त्या अर्थीं यावरून तुह्मी सदर्हू सुपरिंटेंडेंट यांस अधिकार देण्यांत येतो कीं तुह्मी सदर्हू याला/हिला या हुकुमासह आपल्या रखवालींत घेऊन, त्याला/तिला सदर्हू आश्रयस्थानासाठीं सदर्हू आक्टाच्या ९ च्या कलमाअन्वयें स्थापन केलेल्या बोर्डाच्या हुकुमावरून सोडून देण्यांत येई तोंपर्यंत, त्याला/तिला त्या आश्रयस्थानांत संभाळून ठेवावें.

माझ्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिलें असे, आज तारीख माहे सन १८९ .

(सही.)
माजिस्ट्रेट.

---

### ड.—अटकावून ठेवण्याचें वारंट.

( कलम ११. )

———————— येथील रक्तपित्यांच्या आश्रयस्थानाचे सुपरिंटेंडेंट यांस.

ज्या अर्थीं (नांव व वर्णन) याजवर/हिच्यावर माझेकडून, सन १८९६ च्या रक्तपित्यांबाबदच्या आक्टाच्या ९ व्या कलमांत ज्या अपराधास शिक्षा सांगितली आहे तो अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव करण्यांत आला आहे, आणि ज्या अर्थीं सदर्हू (नांव व वर्णन) याजवर/हिच्यावर, त्याच कलमांत ज्या अपराधास शिक्षा सांगितली आहे तो अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव पूर्वीं झाला होता असें माझ्यापुढें शाबित करण्यांत आलें आहे;

त्या अर्थीं यावरून तुह्मी सदर्हू सुपरिंटेंडेंट यांस अधिकार देण्यांत येतो कीं तुह्मी सदर्हू याला/हिला या हुकुमासह आपल्या रखवालींत घेऊन, त्याला/तिला सदर्हू आश्रयस्थानासाठीं सदर्हू आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें स्थापन केलेल्या बोर्डाच्या हुकुमावरून सोडून देण्यांत येई तोंपर्यंत, त्याला/तिला त्या आश्रयस्थानांत संभाळून ठेवावें.

माझ्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिलें असे, आज तारीख माहे सन १८९ .

(सही.)
माजिस्ट्रेट.

---

### इ.—सोडून देण्याचा हुकुम.

(कलम ११.)

———————— येथील रक्तपित्यांच्या आश्रयस्थानाचे सुपरिंटेंडंट यांस.

ज्या अर्थी (नांव व वर्णन) याला/हिला, तारीख माहे सन १८९ च्या हुकुमाअन्वयें तुमच्या रखवालींत दिलें होतें व ज्या अर्थी त्याला/तिला सोडून दिलें असतां लोकांस धोका किंवा गैरसोय होणार नाहीं असें वाटण्यास आह्मास पुरीं कारणें दिसून आलीं आहेत:

त्या अर्थी यावरून तुह्मांस अधिकार देऊन फर्मावण्यांत येतें कीं तुह्मी सदर्हू (नांव) याला/हिला आपल्या रखवालींतून तावडतोब सोडून द्यावें.

आमच्या सहीनिशीं दिला असे, आज तारीख माहे सन १८९ .

१ (सही.)
२ (कित्ता.)
३ (कित्ता.)
आश्रयस्थान-बोर्डाचे मेंबर.

---

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

भिक्षेकरी रक्तपित्यांना इतर लोकांपासून निराळे करून योग्य संरक्षणाखालीं ठेवणें व एकंदर रक्तपित्यांना मानवी प्राण्यांच्या शरीराला लागणाऱ्या वस्तूंशीं संबंध असलेले कित्येक व्यापार व धंदे करण्याची मनाई करणें, इष्ट आहे अशी सूचना साहा वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत आलेल्या लेप्रसी कमिशनानें केली होती, व तेव्हांपासून कित्येक प्रांतांमध्यें त्या कमिशननें केलेल्या शिफारसी अमलांत आणण्याची तजवीज करण्यांत आली आहे. गेल्या वर्षी, बंगालच्या कौन्सिलानें एक आक्ट पसार करून त्यांत, भिक्षा मागण्याखेरीज दुसरें कोणतेंहि निर्वाहाचें दिसतें साधन नसणाऱ्या रक्तपित्यांना धरणें, तपासून पाहणें व इतर लोकांपासून निराळे करून योग्य रीतीनें नेमलेल्या आश्रयस्थानांत ठेवणें या गोष्टींबाबद, व याप्रमाणें निराळे ठेवलेल्या भिक्षेकरी रक्तपित्यांच्या निर्वाहासाठीं व त्यांना औषधोपचार करण्यासाठीं लागणारें फंड पुरविण्याची मदत स्थानिक मंडळ्यांना करतां येण्याबाबद, आणि रक्तपित्यांना वर सांगितल्या प्रकारचे कित्येक धंदे चालविण्याचा प्रतिबंध करण्याबाबद ठराव केले. हा हल्लींचा मसुदा सदर्हू बंगालच्या आक्टाच्या धरतीवर तयार केला आहे, मात्र इतकेंच कीं तो सगळ्या हिंदुस्थानास लागू व्हावयाचा असून, तो त्याच्या कोणत्याहि भागास लागू होणें तो स्थानिक सरकारानें, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन, त्या भागास तो लागू केला आहे असें जाहिर करण्यासाठीं जाहिरनामा काढल्यावर लागू होईल, तत्पूर्वीं लागू होणार नाहीं. ज्या ठिकाणीं, बंगाल्याप्रमाणें, सदर्हू विषयाच्या संबंधानें आधींच योग्य तजवीज करण्यांत आलेली आहे त्या ठिकाणीं हा योजिलेला आक्ट सदर्हूप्रमाणें लागू न करितां तेथील स्थानिक कायदा अमलांत राहूं देण्यांत येईल.

तारीख ३० माहे जुलै सन १८९६. (सही) जे. वुडबर्न.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.